**पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम**
**काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम ता.जि.वाशिम - 444505**
**दुरध्वनी क्रमांक : 07252-232134**
**ई-मेल- sp.washim@mahapolice.gov.in**

# प्रेस नोट

## नवदुर्गोत्सव -2021

वाशिम जिल्ह्यात दिनांक 07.10.2021 रोजी एकुण 465 सार्वजनीक दुर्गा देवी व 25 सार्वजनीक शारदा देवी ची स्थापना झाली आहे. दि. 15.10.2021 रोजी दसरा सण साजरा करण्यात येत आहे. दि. 16.10.2021 आणि दि. 17.10.2021 रोजी दुर्गादेवी व शारदादेवी विसर्जन होणार आहे.

दुर्गादेवी उत्सवाचे काळात कायदा व सुव्यवस्था परिस्थीती आणि जातीय सलोखा कायम राखण्याकरीता पुर्व तयारी म्हणुन दिनांक 22.09.2021 रोजी पासुन विशेष मोहीम राबविण्यात आली आहे. त्यामध्ये वरिष्ठ अधिकारी आणि ठाणेदार यांचेकडुन जिल्हयातील एकुण 367 गावांना भेटी देऊन तेथील विसर्जन मार्ग, विसर्जन स्थळांची पाहणी करण्यात आली आहे. तसेच शांतता समिती, मोहल्ला समिती, दुर्गादेवी उत्सव मंडळे, पुतळा सुरक्षा समिती, धार्मीकस्थळे समिती, डि.जे. चालक/मालक यांच्या बैठका घेऊन कोविड-19 संदर्भातील नियमांचे पालन करून दुर्गा उत्सव शांततेत साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दुर्गादेवी उत्सव दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरीता एकुण 209 ईसमांविरूध्द कलम 107,116 (3) फौजदारी प्रक्रीया सहिंता नुसार तसेच एकुण 22 ईसमांविरूध्द कलम 110 फौजदारी प्रक्रीया सहिंता नुसार कारवाई करण्यात आली आहे. अवैध धंद्याविरूध्द दारूबंदी कायद्यानुसार एकुण 29 केसेस करून 124410/- रू चा माल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच महाराष्ट्र जुगार कायदा नुसार 26 केसेस करून 106150/- रू चा माल हस्तगत करण्यात आलेला आहे.

जिल्हयात एकुण 24 ठिकाणी दंगा नियंत्रण योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली आहे. एकुण 33 ठिकाणी प्रभावीपणे पोलीस रूटमार्च घेण्यात आला आहे. दि. 03.10.2021 रोजी मा.पोलीस अधिक्षक आणि अपर पोलीस अधिक्षक श्री गोरख भामरे यांचे उपस्थीतीत व मार्गदर्शनात एकुण 250 पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सहभाग घेऊन वाशिम शहरामध्ये रूटमार्च केला आहे. जिल्हयातील सर्व पोस्टे चे अधिकारी व अंमलदार यांनी विविध ठिकाणी 'कोबिंग ऑपरेशन' राबवुन शरीरा विरूध्दचे गुन्हयातील आरोपी, मालमत्ता गुन्हयातील आरोपी, आर्मअॅक्ट गुन्हयातील आरोपी, सराईत गुन्हेगार, निगराणी बदमाश, पॅरोलवरील कैदी, अशा गुन्हेगारांची तपासणी केली आहे.

दुर्गादेवी उत्सव बंदोबस्ताकरीता जिल्हा अस्थापनेवरील 01 अपर पो. अधिक्षक, 01 पोलीस उपअधिक्षक, 16 पोलीस निरीक्षक, 71 स.पो. नि./पो.उप नि., 1000 पुरूष व महिला अंमलदार, असे मनुष्यबळ तैनात करण्यात येत असुन बाहेरील एकुण 407 पुरूष व 68 महिला होमागार्ड आणि SRPF चे 02 प्लाटुन प्राप्त झाले आहेत. मा. पोलीस अधिक्षक संपुर्ण बंदोबस्तावर देखरेख करीत आहेत.

दिनांक 07.10.2021 रोजी पासुन शासनाने सर्व धार्मीकस्थळे सामान्य दर्शनसाठी खुली करण्याची परवानगी दिली आहे. जिल्हयातील सर्व नागरीकांनी व धार्मीकस्थळाचे प्रमुखांनी कोविड-19 संदर्भातील नियमांचे कोटेकोरपणे पालन करून धार्मीकस्थळाचे ठिकाणी गर्दी होणार नाही याची खबरदारी घ्यावी. तसेच नवदुर्गा उत्सवाचे अनुषंगाने पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे. काही आक्षेपार्ह घटनेची माहीती प्राप्त झाल्यास नियंत्रण कक्ष वाशिम येथे संपर्क करावा. दुर्गादेवी उत्सव, दसरा सण, रावण दहन, धम्मचक्र प्रवर्तन दिन ई. उत्सव साध्या पध्दतीने कोणतेही सार्वजनिक कार्यक्रम किंवा मिरवणुकीचे आयोजन न करता साजरे करावेत असे आवाहन करण्यात येत आहे.

8/10/21

[डि.सी. खंडेराव]
पोलीस निरीक्षक, जिविशा
पोलीस अधिक्षक, वाशिम करीता